फक्त सभासदांकरिता

स्थापना: २९ मे १९६२

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग: पिन 416803.
फोन : ( ०२३६४ ) २४७७२१

**संचालित**

**१. डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,मुटाट**
**२. कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय,मुटाट**
**३. डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे**

---

## ५८ वा
## वार्षिक अहवाल
## आणि
## २०१९-२०
## या वर्षाची हिशेब पत्रके

---

मुंबई कार्यालय:
कार्याध्यक्ष : श्री विनायक कृष्णाजी लेले,
१५/ ब,स्वाती अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.
दूरध्वनी: २३८७६०३६

मुटाट कार्यालय:
कार्यवाह : श्री सुभाषचंद्र गणेश परांजपे
डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग: पिन- ४१६८०३.
दूरध्वनी: ( ०२३६४ ) २४७७२१

---

**Registered under:**

**संस्था नोंदणी कायदा :**
**21/1860 अन्वये नोंदणी क्र.बिओएम् /63/आर् एन्आर्**
**Societies Registration Act,1860**
**No. BOM/63/RNR**

**मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, 1950**
**अन्वये नोंदणी क्र.एफ् / 2046 (मुंबई),**
**Bombay Public Trust Act, 1950**
**No. F/2046 (Bombay/Mumbai)**

---

**नोंदणी कार्यालय : मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा: श्री विनायक कृष्णाजी लेले, १५/ब, स्वाती अमृतकुंभ सोसायटी, चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.**

---

**(नोंदणी कार्यालयाचा जुना पत्ता : द्वारा श्री.सुहास चिरपुटकर, मुकुंद भुवन , गावदेवी, मुंबई ४००००७, डिसेंबर २०१७ पासून रद्द करण्यात आला आहे) .**

---

**PAN : AAATM5432E**

---

**मंडळास दिलेल्या देणग्या आयकर कलम 80 G खाली आयकर सवलतीस पात्र आहेत.**
**Donations are Exempted u/s 80 G of I T Act, 1961: Perpetual Validity.**

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**आद्य संस्थापक: कै. डॉ.श्रीधर रघुनाथ लेले**

**विश्वस्त**

**श्री विष्णु सखाराम मराठे श्री अनंत श्रीधर डॉ.दिलीप केशव राणे**

**कार्यकारी समिती (कार्यकाल: २०१७ ते २०२२)**

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | श्री विश्वासराव रामचंद्र पाळेकर, | उपाध्यक्ष | श्री शिवाजी कृष्णा राणे, |
| उपाध्यक्ष | श्री धनंजय गणेश परांजपे, | कार्याध्यक्ष | श्री विनायक कृष्णाजी लेले, |
| कार्योपाध्यक्ष | श्री श्री जितेंद्र मोतीराम साळुंके, | कार्यवाह | श्री सुभाषचंद्र गणेश परांजपे, |
| सह कार्यवाह | श्री विवेक विष्णु केळकर, | सह कार्यवाह | श्री रघुनाथ रत्नोबा पाळेकर , |
| कोषाध्यक्ष | श्री संजय दत्ताराम टाकळे, | सह कोषाध्यक्ष | डॉ. विनय विष्णु केळकर, |
| सभासद | सौ. गीता श्रीकृष्ण सोवनी, | स्वीकृत सभासद | श्री अरविंद मनोहर ठाकूरदेसाई, |
| स्वीकृत सभासद | श्री मनोहर गोविंद लेले | स्वीकृत सभासद | श्री मुरलीधर शांताराम राणे, |
| स्वीकृत सभासद | डॉ. हेमलता माधव पुरंदरे | | |

## विषेशाधिकार समिती

| | | |
|---|---|---|
| श्री रमेश अच्युत घाटे | श्री बळवंत शिवराम राणे | श्री बाळकृष्ण रामचंद्र पाळेकर |
| श्री अच्युत अर्जुन राणे | श्री किशोर शंकर प्रभू | श्री राजेश शांताराम राणे |
| डॉ. दिलीप पांडुरंग पाळेकर | श्री श्रीकृष्ण दत्तात्रय सोवनी | श्री अरुण कृष्णा राणे |

## स्थानिक समिती मुटाट

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेश दत्ताराम पाळेकर | श्री. यशवंत वामन पाळेकर | सौ. सुप्रिया सुर्यकांत टाकळे |
| श्री. चंद्रकांत पांडुरंग पाळेकर | श्री. सुरेश श्रीकांत चिरपुटकर | सौ. मितल मंगेश पाळेकर |
| श्री. हरिश्चंद्र मधुकर परब | श्री. रविंद्र भिकाजी प्रभू | श्री. भास्कर अनंत पाळेकर |
| श्री. चंद्रकांत रामचंद्र घाडी | सौ. अमृता अनिल परांजपे | श्री. अमोल वासुदेव पाळेकर |
| श्री. प्रमोद महादेव चव्हाण | सौ. रेश्मा मनोहर तेली | श्री. अनिल शांताराम पाळेकर |
| सौ. स्मिता अजय मराठे | श्री. दिलीप बाळकृष्ण जोशी | श्री. योगेश सुभाष पाळेकर |
| श्री. विठोबा शंकर प्रभू | श्री. शकील लतीफ मुल्ला | सौ. आरती अनंत घाडी |
| श्री. केशव रघुनाथ साळुंके | श्री. सिताराम कृष्णा प्रभू | |
| श्री. रघुवीर श्रीराम लेले | श्री. संजय सदानंद पाळेकर | |

## स्थानिक समिती मणचे

**सल्लागार- 1. श्री. मोरेश्वर अनंत गोखले 2. श्री. शंकर बाबाजी तोरस्कर**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल दिनकर धाक्रस | सौ. सारिका मनेश रहाटे | श्री. नरेंद्र शंकर मणचेकर |
| श्री. अलकेश एकनाथ गुरव | सौ. पूजा मुकेश काडगे | श्री. अजित मधुकर कानेटकर |
| श्री. प्रदीप रामचंद्र फाळके | श्री. सादिक अब्दुल्ला पावसकर | श्री. गोपिचंद परशुराम कदम |
| श्री. अरविंद भिकाजी घाडी | श्री. विजय राम देवळेकर | |

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग**

## <u>५८ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना</u>

सूचना देण्यात येते की मंडळाच्या सर्व सभासदांची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,मुटाट, ता.देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, ४१६८०३, येथे खाली नमूद केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येत आहे. सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहावे ही विनंती.

**<u>सभेपुढील कामे</u>**

१. तारीख १६ ऑगस्ट २०१९ रोजी मुटाट येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २०१९-२० या वर्षाचे मंडळाचे आय-व्यय तसेच तारीख ३१ मार्च २०२० रोजीचा मंडळाचा ताळेबंद, हायस्कूलचे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१९-२० या वर्षाचे जमाखर्च मंजूर करणे. तसेच लेखापरीक्षकांनी दिलेल्या अहवालाचे वाचन करुन त्यात नमूद केलेल्या सुचना-त्रुटींवर चर्चा करुन निर्णय घेणे.
३. सन २०१९-२० या वर्षाचा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळाचा छापिल अहवाल मंजूर करणे.
४. सन २०२०-२१ या वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांची फी व मानधन ठरविणे.
५. सन २०२०-२१ या वर्षाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास विचारविनिमयानंतर मंजूरी देणे.
६. मंडळाच्या ताळेबंदात चालू बांधकामे म्हणून दिसत असलेल्या स्थावर मालमत्ता, जमीन, इमारती वगैरेंच्या संबंधित शासकीय यंत्रणांकडे केलेल्या नोंदीनां मान्यता देऊन लेखापरीक्षकांच्या सल्ल्याने भांडवलखाती मुल्य नोंदी करणे तसेच आय-व्यय आणि ताळेबंदातील निष्क्रीय उपखात्यांचे निर्लेखन करणे आणि/किंवा उपखात्यांचे तपशीलासह समानवर्गी खात्यांत विलिनीकरण करणे संबंधीचे निर्णय घेणे.
७. डॉ.श्री.र.लेले हायस्कूल इमारतीचे नुतनीकरण, कनिष्ठ महाविद्यालय इमारत दुरुस्ती आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा इमारतींच्या सुशोभिकरणाबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
८. मंडळाच्या घटना दुरुस्ती संबंधातील प्रगतीचा आढावा घेऊन सुसंगत निर्णय घेणे.
९. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

मुंबई/मुटाट
तारीख : ३१.०१.२०२१

सही-सुभाषचंद्र गणेश परांजपे
कार्यवाह

---

**विशेष सूचना:** गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठीक ११. ०० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**टीप:** हिशेबाबाबत सर्वसाधारण सभेत काही खुलासा पाहिजे असल्यास तशी लेखी विचारणा मुटाट कार्यालयात दिनांक २०. ०२.२०२१ पर्यंत करावी ही विनंती.

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## ५८ वा वार्षिक अहवाल

**दिनांक १.०४.२०१९ ते ३१.०३.२०२०**

सभासद बंधु आणि भगिनींनो,
सविनय नमस्कार,

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचा तारीख १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या वर्षाचा अठ्ठावन्नावा कार्य अहवाल कार्यकारी समितीच्या वतीने आपल्या माहितीसाठी आणि मंजूरीसाठी सादर करीत आहोत. कार्यवृत्तांत काळात कार्यकारी समितीने डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, आणि कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय परिसरात आवश्यक सोयी, सुविधा, सुधारणा आणि अन्य कामे नियोजनाप्रमाणे पूर्ण केली आहेत.

मंडळाच्या विकास कामांसाठी काही संस्था, दानशूर मंडळी आणि मंडळाच्या काही मान्यवर सभासदांनी उदारहस्ते निधी दिला आहे. अहवाल काळात निधी संकलनासाठी अनेक सभासदांनी, मान्यवर कार्यकर्त्यांनी आणि हितचिंतकांनी प्रयत्न केले, समयोचित मार्गदर्शक सूचना केल्यांमुळे बहुतांश कामे अपेक्षेप्रमाणे पूर्ण होऊन कार्यपूर्तीचे समाधान मिळाल्याने सर्व सभासदांच्या उत्साहात भर पडली आहे.

कार्यकारी समिती या कार्यवृत्तांताच्या माध्यमातून मंडळांतर्गत पूर्ण झालेल्या, चालू असलेल्या प्रगतीपथावरील विकास कामांचा लेखाजोखा, लेखापरीक्षण झालेल्या हिशेबांसोबत आपल्यासमोर सादर करीत आहे. आपले मंडळ आगामी वाटचालीत तंत्रशुध्द नियोजन आणि अंमलबजावणी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करण्यावर भर देणार असून आस्थापनातील प्रशासकीय कामे आणि विकास कामे नियोजनपूर्वक पूर्ण करण्यात येतील याची खात्री आमच्या सर्व सभासदांनी बाळगावी.

मंडळाच्या कार्य अहवालासोबत डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट या शैक्षणिक आस्थापनांचा, प्राचार्य/मुख्याध्यापक श्री दिलीप तुकाराम घरपणकर यांनी सादर केलेला सन २०१९-२० या वर्षाचा माहितीपूर्ण कार्यवृत्तांत सन्माननीय सभासदांच्या माहितीसाठी जोडला आहे.

मंडळाचे लेखापरीक्षण झालेले सन २०१९-२० या वर्षाचे आयव्यय आणि ३१ मार्च २०२० रोजीचा ताळेबंद तसेच हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१९-२० चे जमाखर्च सभासदांच्या माहितीसाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यता-मंजूरीसाठी जोडले आहेत.

**दिवंगत सभासदांचे स्मरण:**

वृत्तांत काळात मंडळाचे आजीव सभासद श्री नरहर पर्शरान लेले (31.03.2020) यांचेसह निधन पावलेल्या ज्ञात अज्ञात सभासदांचे स्मरण करुन कार्यकारी समिती मंडळाच्या सर्व सभासदांच्यावतीने सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**अहवाल काळात पूर्ण झालेल्या, सुरू असलेल्या आणि विचाराधीन विकास कामांची माहिती:**

1. मंडळाचे उपाध्यक्ष श्री धनंजय गणेश परांजपे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मा.खासदार श्री विनायकराव राऊत यांच्या खासदार निधीतून अतिरिक्त रुपये पांच लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या पांच लाखांच्या निधीतून शासनाच्या संमतीने मंडळाने व्यायामशाळा बांधण्याचा निर्णय घेतला. सदर वर्गखोलीचा वापर व्यायामशाळा म्हणून करण्याचे मंडळाने निश्चित केले आहे. व्यायामशाळेसाठी आवश्यक साहित्य जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडून लवकरच प्राप्त होईल.

वर्गखोलीचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाल्यानंतर लक्षात आले की, मंजूर खासदार निधीतून सुमारे 200 स्के.फूटांचे लोडबिअरिंगचे टिकाऊ बांधकाम होऊ शकते. मंडळाने वर्गखोली बांधकामास जोडून सलग सुमारे 300 स्के.फुटांचे अधिकचे बाधकाम अंदाजे रुपये

साडेतीन लाखांचा स्वनिधी वापरुन करण्यास मान्यता दिली. अहवाल काळात वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. खासदार निधीतून मिळालेल्या देणगीबाबत मा.खा.विनायक राऊत यांचे मंडळ आभारी आहे.

2. मुटाट आणि मणचे येथिल इमारतींमधील पावसाळी पाणी गळती थांबविण्यासाठी आवश्यक दुरुस्ती कामकाज करण्याचे निर्देश मंडळाने दिले आहेत. तथापि हे काम पावसाळ्यापूर्वी करावयाचे असल्याने निविदा मागविण्यासाठी मंजूरी-मान्यता देण्यात आली आहे.

3. इमारतीना रंग देणे, संकुल परिसरात शोभेच्या तसेच उपयुक्त झाडांची लागवड करणे, मणचे येथिल पोषण आहार खोलीचे प्लॅस्टर करणे, पिण्यासाठी आणि स्वच्छतागृहात नळाचे पाणी फिरविणे, पाणी शुध्दीकरण यंत्रणा अद्ययावत करणे/ठेवणे ही कामे प्राधान्याने करण्यावर मंडळाने भर दिला आहे.

4. डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या मूळ इमारतीवर मजला बांधणे सुरक्षित असल्याचा अहवाल बांधकाम विशारदांनी दिला असल्याने पुनर्बांधणीच्या प्राथमिक कामांना सुरुवात करण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला आहे.

**नवीन सभासद:** मंडळाच्या पुनरचित घटना नियमांना धर्मादाय आयुक्त कार्यालयाची मंजूरी/मान्यता मिळेपर्यंत मंडळाकडे सभासद होण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज स्थगित ठेवण्यात आले आहेत. मा. धर्मादाय आयुक्तांच्या मंजूरीनंतर नवीन सभासद करण्याचे काम सुरु होईल.

**अर्थसंचय**:

वृत्तांत वर्षामध्ये मंडळाचे विविध शैक्षणिक उपक्रम,पारितोषिके आणि शिष्यवृत्त्यां, सामान्य निधी, पोषण आहार कक्ष सजावट, खासदार विकासनिधीतून व्यायामशाळा बांधकाम, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयामधील विकास कामांसाठी तसेच अन्य विधायक सुविधांसाठी ३१ मार्च २०२० पर्यंत अनेक दानशूर व्यक्तींकडून आणि संस्थांकडून मंडळाला देणग्यांद्वारे आर्थिक सहाय्य मिळाले. आम्ही त्या सर्व दात्यांचे आभारी आहोत. प्रमुख देणग्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:

| देणगीदाराचे नांव : | देणगी उद्देश | देणगी रक्कम (रु) |
|---|---|---|
| 1. श्री विनायक कृष्णाजी लेले | वडील कै.कृ.वि.लेले यांच्या स्मरणार्थ | 1,00,000/- |
| 2. श्री उदय गंगाराम वारीक (माजी विध्यार्थी) | विनाअट देणगी. | 1,00,000/- |
| 3. श्री अशोक मनोहर देसाई (माजी विध्यार्थी) | विनाअट देणगी. | 51,000/- |
| 4. श्री अच्युत अर्जुन राणे (सल्लागार) | मातोश्री कै. द्रौ.अ. राणे स्मरणार्थ पारितोषिकात वाढ | 4000/- |
| 5. श्री विजय महादेव पांगम (सदस्य) | कै.म.ना.पांगम आणि कै.सौ.पा.म.पांगम स्मृती पारितोषिकात वाढ | 5000/- |
| 6. श्री रमेश रामचंद्र भिडे (माजी विध्यार्थी) | आईवडिलांच्या स्मरणार्थ पारितोषिक : निकष मंडळाने ठरवायचे. | 10,000/- |
| 7. श्री सदानंद वामन पवार (उपाध्यक्ष ,देवगड एज्यु. बोर्ड ) | विनाअट देणगी | 11,000/- |
| 8. श्री काशीनाथ रत्नोबा पाळेकर (माजी विद्यार्थी) | सामान्य निधीसाठी देणगी. | 1,00,000/- |
| 9.श्री दिलीप यशवंत लेले (सहा.शिक्षक) शैक्षणिक निधीसाठी | | 5,000/- |
| 10. श्री सुदर्शन शिवाजी राणे (विद्यार्थीनी कक्ष) | | 15,000/- |
| 11. ड़ॉ. रामकृष्ण भिकाजी काळे – ग्रंथालयासाठी | | 10,000/- |
| 12. श्री मकरंद प्रकाश बापट - इमारत निधी | | 5,555/- |
| 13. श्री भास्कर अनंत पाळेकर – क्रीडा स्पर्धा | | 5,000/- |
| 14. श्री मंगेश अच्युत राणे – शिष्यवृत्ती | | 25,000/- |
| 15. श्री श्रीधर चिंतामण लेले – सर्वसामान्य निधी | | 5,000/- |
| 16. सौ. श्रध्दा शंकर पराडकर - क्रीडा स्पर्धा | | 6,000/- |
| 17. श्री धोंडी रामचंद्र जोशी - क्रीडा स्पर्धा | | 6,000/- |

18. सौ. अलकनंदा धोंडी जोशी – क्रीडा स्पर्धा 6,000/-

19. सौ. सुहानी सुनिल इसवलकर -क्रीडा स्पर्धा 5,000/-

20. श्री भास्कर सावळाराम परांजपे – पारितोषिक 4,000/-

21. The Windsor, Mumbai 20,000/-

22. श्री उमाकांत सदानंद राणे – सर्वसामान्य निधीसाठी 10,000/-

23. सौ. शुभांगी हेमंत पेठे -पारितोषिक 4,500/-

24. श्री अनिल जगन्नाथ लेले – पारितोषिक 3,000/-

25. श्रीमती शुभांगी रविंद्र गोरे – पारितोषिक 5,000/-

26. श्री विजय विश्वनाथ ठाकूरदेसाई – शैक्षणिक निधी 2,500/-

27. श्री केतन रामचंद्र वारीक – पारितोषिक 70,000/-

28. श्री रमेश लक्ष्मण ताम्हनकर – पारितोषिक 3,000/-

29. श्री समीर माधव लेले – पारितोषिक 16,550/-

30. सौ. मृणाल रामदास कोयंडे- शैक्षणिक निधी 4,000/-

31. सौ. श्रध्दा शंकर पराडकर – शैक्षणिक निधी 3,000/-

**अन्य उत्पन्न:**

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या आवारातील हापूस आंब्यांच्या विक्रीतून रुपये 15,000 चे उत्पन्न मंडळास मिळाले.

**खर्चाच्या बाबी:**

मंडळाच्या ठळक उत्पन्नाच्या बाबींचा वर उल्लेख केला आहे. आता मंडळाच्या खर्चाच्या बाबींकडे वळतो.

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालातील गुणवंत विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक, कला-क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व, व्यक्तिमत्व विकास, विविध स्पर्धा परीक्षा, विविध प्रदर्शने यातील चकमदार यशप्राप्तीसाठी गुणगौरव पारितोषिके तसेच हुशार आणि गरजू विध्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्रदान करण्यासाठी सन्माननीय देणगीदारांनी मंडळास देणग्या दिल्या आहेत. या देणग्यांच्या गुंतवणुक व्याजातून दरवर्षी विध्यार्थ्यांना पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या वितरीत केल्या जातात. अहवाल काळात वितरण केलेली पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या पुढीलप्रमाणे:

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलमधून शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या गरीब व होतकरु गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षण खर्चासाठी शिष्यवृत्यां दिल्या जातात. सन २०१९-२० या वर्षामध्ये पुढीलप्रमाणे शिष्यवृत्यांचे वितरण केले गेले.

१. कै.गणेश अनंत सोवनी शिष्यवृत्ती रु.२५००.००
२. कै.रामचंद्र विष्णु लेले व कै.सीताबाई रामचंद्र लेले शिष्यवृत्ती रु. ७५०.००
३. श्री.शंकर गोविंद लेले व सौ.सुमती शंकर लेले शिष्यवृत्ती रु. ५००.००
४. कै.सौ. शारदा कृष्णा राणे शिष्यवृत्ती रु. ५००.००
५. कै.भिकाजी ऊर्फ दादा चिरपुटकर शिष्यवृत्ती रु. ५००.००
६. कै.कृष्णा सिताराम राणे स्मृती शिष्यवृत्ती रु.१,०००.००

वरील शिष्यवृत्त्यांसह सन २०१८-१९ मधील गुणवंत विद्यार्थ्यांना विविध विषयांतील वार्षिक परीक्षेतील उल्लेखनीय यश तसेच क्रीडा,वक्तृत्व व विविध स्पर्धात्मक परीक्षेतील उल्लेखनीय यश प्राप्तीबद्दल बक्षिसे म्हणून सुमारे रुपये 20,000/-, दिनांक २७ डिसेंबर २०१९ रोजी पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभांत देण्यात आली.

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलचे (कै.भाऊसाहेब काळे भागशाळेसह) आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी अभ्यासाबरोबर तालुका, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय

यश प्राप्त करु लागले आहेत. अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये चमकू लागले आहेत. ग्रामीण भागातील अडचणी आणि आर्थिक मागासलेपणावर मात करीत आमच्या विध्यार्थ्यांची प्रगती अभिमान वाटावा अशी आहे. मुटाट परिसरातील विध्यार्थ्यांच्या अंगीभूत नैपुण्याला,कलागुणांना व हुशारीला वाव देण्यासाठी मंडळ करीत असलेल्या बहुस्तरीय प्रयत्नांस विद्यार्थी उत्तम यश मिळवून दाद देत

आहेत याचा आर्वजून उल्लेख करणे आम्हाला प्रशस्त वाटते. मंडळाने निर्माण केलेल्या सुविधांचा लाभ घ्यायला विध्यार्थी पुढे येत असून शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर शिक्षकांकडूनही प्रोत्साहन आणि सुयोग्य मार्गदर्शन करण्यात येते. आमच्या सभासदांना याचा नक्की आनंद वाटेल.

**शिक्षणसेवक आणि संगणक शिक्षणासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनाचा खर्च**:

मंडळाने सन २०१९-२० वर्षामध्ये नियुक्त केलेल्या शिक्षणसेवकांच्या तसेच संगणक आय.सी.टी.निर्देशकाच्या संपूर्ण मानधनाचा खर्च सुमारे 5,00,000/- रुपये मंडळास स्वयं-अर्थसहाय्य मिळवून करावा लागला. मंडळ उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी करावा लागणारा खर्च कायमस्वरुपी वाढता असून तो भागविण्यासाठी कार्यकारी समितीने सामान्य (कायमस्वरुपी) निधी उभा करण्यास सुरुवात केली आहे त्यास सन्माननीय देणगीदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तरीही निधी कमतरतेचा सामना करावा लागू नये म्हणून आमच्या सर्व सभासद बंधु-भगिनींना, सामान्य निधीस तसेच हायस्कूल, भागशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींच्या दुरुस्ती-देखभाल-नुतनीकरण निधीस वैयक्तिक देणगी देवून आप्तजनांकडून देणग्या मिळविण्याचे महत्कार्य करावे असे विनम्र आवाहन कार्यकारी समितीतर्फे करण्यात येत आहे.

**उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा- फेब्रुवारी/मार्च २०२०- विद्यार्थ्यांचे उज्वल यश :**

स्वयंअर्थसहाय्यित कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ट महाविद्यालयाचे फेब्रुवारी- मार्च २०२० मध्ये पार पडलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेला प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी ९७.२० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**माध्यमिक शालान्त परीक्षा मार्च २०२०- विद्यार्थ्यांचे उज्वल यश :**

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा,मणचे येथिल मार्च २०२० मध्ये पार पडलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेला बसलेले ९८.९७ टक्के विद्यार्थी उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाले.
त्याचबरोबर आपल्या हायस्कूलमधून माध्यमिक शालांत परीक्षेला बसलेल्या यशवंतराव राणे माध्यमिक विद्यालय बापार्डे येथिल विद्यार्थ्यांनीही परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. (एकत्रित टक्केवारी ९८.४१).

मंडळाच्या सर्व सभासदांच्यावतीने उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा आणि माध्यमिक शालान्त परीक्षेतील सर्व यशस्वी विध्यार्थी आणि विध्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन. तसेच विध्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन करुन उज्वल यश मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या कनिष्ट महाविद्यालय आणि हायस्कूलचे प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व व्याख्याते, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

**४५ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन:** डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक ३ डिसेंबर २०१९ ते ५ डिसेंबर २०१९ या कालावधीत देवगड तालुकास्तरीय ४५ वे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे नियोजन उत्कृष्ट प्रकारे करुन ते यशस्वी करण्यात आले. तालुक्यातील प्राथमिक आणि माध्यमिक मिळून एकूण १२८ शाळांनी सहभाग नोंदविला. या प्रदर्शनामुळे शिक्षकांच्या व विध्यार्थ्यांच्या अनुभवात भर पडली.

**पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन २०१९:** दिनांक २७ डिसेंबर २०१९ रोजी मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वासराव पाळेकर पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. सदानंद वामन पवार ( उपाध्यक्ष ,देवगड एज्यु. बोर्ड ), सन्माननीय पाहुणे म्हणुन श्री. अशोक मनोहर देसाई,सौ. आकांक्षा अशोक देसाई आणि श्री रमेश रामचंद्र भिडे उपस्थित होते. त्याचबरोबर सर्वश्री विजय पांगम आणि अच्युतराव राणे या मान्यवरांची उपस्थिती

लाभली. उपाध्यक्ष श्री धनंजय परांजपे, उपाध्यक्ष श्री शिवाजी राणे, कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे, कार्योपाध्यक्ष श्री जितेंद्र साळुंके, सहकोषाध्यक्ष डॉ. विनय केळकर, सहकार्यवाह श्री रघुनाथ पाळेकर, सल्लागार श्री बाळकृष्ण पाळेकर,डॉ.दिलिप पाळेकर यांच्यासह कार्यकारी समितीचे सभासद सौ. गीता सोवनी आणि श्री अरविंद ठाकुरदेसाई उपस्थित होते. स्थानिक समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली निर्मिलेल्या सुबक व सुंदर अशा "**संस्कारदीप**" या हस्तलिखिताचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या प्रदान करण्यात आल्या. मंडळाचे मणचे येथिल जेष्ठ कार्यकर्ते श्री बापू गोखले यांच्या कविता वाचनास प्रमुख पाहुण्यांसह सर्वांनी दाद दिली.पारितोषिक वितरणानंतर प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांसह सर्वांनी सहभोजनाचा लाभ घेतला.

शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी ठीक २.३० वाजता, कार्यकारी समिती, स्थानिक समिती मुटाट आणि स्थानिक समिती मणचे यांच्या सर्व सभासदांची संयुक्त सभा डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट येथे मंडळाच्या कार्यालयात भरली होती. सभेस एकूण 26 सभासद आणि निमंत्रित हजर होते.

**दिनांक २८ डिसेंबर २०१९** रोजी दुपारी स्नेहसंमेलन कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमांच्या आकर्षक सादरीकरणात आनंदी वातावरणात पार पडला. स्नेहसंमेलनांस उपस्थित असलेले मान्यवर पाहुणे, पालक मंडळी, ग्रामस्थ आणि हितचिंतकांनी विध्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले.

**प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२० :** प्रजासत्ताक दिनाच्या मुहुर्तावर मंडळाचे उपाध्यक्ष श्री शिवाजी कृष्णा राणे यांनी उत्तम दर्जाच्या २४ खुर्च्या देणगी म्हणून दिल्या. तसेच हायस्कूलच्या १९८९/९० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्यावतीने श्री सुधाकर परांजपे यांनी १०० खुर्च्या देणगी म्हणून दिल्या. मंडळाच्या सर्व सभासदांच्यावतीने या सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.

सभासद बंधु आणि भगिनिनो! डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै.भाऊसाहेब काळे भागशाळेसह आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य-मुख्याध्यापकांचा स्वतंत्र माहितीपूर्ण सविस्तर अहवाल सोबत जोडलेला आहे. या अहवालात सन्माननीय सभासदांना मंडळाच्या शैक्षणिक आस्थापनातील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल तसेच शिक्षणपुरक आणि शिक्षणेतर तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांतील यश, क्रीडा आणि सांस्कृतीक स्पर्धा क्षेत्रातील यश आणि अन्य चमकदार कामगिरीबद्दल उद्बोधक माहिती मिळेल.

**कार्यकारी समितीच्या सभा:** वृत्तांत वर्षांमध्ये कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधीत झालेल्या कार्यकारी समिती सभेच्या उपस्थितीचा तपशील खालील कोष्टकात दिला आहे. या सभांना सरासरी ५९ टक्के इतकी उपस्थिती होती. कार्यकारी समितीच्या प्रत्येक सभेमध्ये मंडळाच्या अंगिकृत उपक्रमांच्या कामकाजावर साधक बाधक विचार विनिमय होऊन विषयवार सखोल चर्चेअंती सर्व निर्णय सर्व सम्मतीने घेण्यात आले. कार्यकारी समितीच्या दोन सभा डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट येथे आणि बाकीच्या सभा कार्यकारी समितीचे कार्याध्यक्ष श्री. विनायक कृष्णाजी लेले यांच्या दादर येथील निवासस्थानी घेण्यात आल्या.

| वृत्तांतवर्ष | कार्यकारी समितीच्या सभांची संख्या | सदस्यांची सरासरी उपस्थिती |
|---|---|---|
| २०१९-२० | ६ | ५९ टक्के |

**वार्षिक सर्वसाधारण सभा** : मंडळाची ५७ वी (सत्तावन्नावी) वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट, ता.देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, ४१६८०३, येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस मंडळाचे एकूण ४० सभासद हजर होते. कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वासराव पाळेकर हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

सभारंभी, सन २०१८-१९ या वर्षात दिवंगत झालेल्या मंडळाच्या सभासदांना दोन मिनिटे उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. नंतर सभेच्या पटावरील पुढील विषय विचार विनिमयासाठी घेण्यात आले.

कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे सभेत वाचन केले. या वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावांच्या कार्यवाहीसंबंधातील माहिती सदस्यांना देण्यात आली.

इतिवृत्तांवर विचारविनिमय आणि चर्चा झाल्यावर उपस्थित सदस्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०१८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास ठराव मांडून सर्वानुमते मंजूरी दिली.

मंडळाचे सन २०१८-१९ या वर्षाचे लेखापरीक्षक मे. परांजपे अँड असोसिएटस, चार्टर्ड अकाऊटंट यांनी लेखापरीक्षण केलेले आयव्यय, ता.३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद, हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१८-१९ चे जमाखर्च सभेच्या मंजुरीसाठी पटावर ठेवण्यात आले.

सहकोषाध्यक्ष डॉ. विनय केळकर यांनी मे.रायकर, यांचे एक बिल आणि अन्य काही बाबीं लेखापरीक्षकांच्या सल्ल्याने योग्य खाती वर्ग केल्याचे सभेत स्पष्टीकरण दिले. दिनांक ३० सप्टेंबर २०१८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या ताळेबंदातील येणी अंतर्गत कर्जाऊ शिष्यवृत्त्यांची शेष येणे रक्कम २०१८-१९ या आर्थिक वर्षात जमा झाल्याने ताळेबंदातील ते खाते-उपकलम रद्दबातल करण्यास लेखापरीक्षकांनी मान्यता दिल्याचे सांगितले. मंडळाचे भूखंड, इमारती आणि अन्य मालमत्तांतील मुल्यवाढ, घसारा इत्यादिं वर्ग करुन खाते ताळेबंदात दाखविण्यास तसेच आय-व्यय मधील काही खाती -उपखाती एकत्रित करण्यास आजच्या सभेने मान्यता द्यावी असा प्रस्ताव सभेत मांडला तो सर्वमान्य झाला.

हिशोबाशी संबंधीत सर्व महत्वाच्या बाबींची पूर्तता झाल्याने चर्चेअंती सन २०१८-१९ चे आयव्यय, तारीख ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद आणि हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन २०१८-१९ च्या जमाखर्चास सभेने सर्वसम्मतीने ठरावाद्वारे मंजूरी दिली.

वार्षिक सर्वसाधारण सभेने, मंडळाचे सनदी लेखापरीक्षक म्हणून मे . परांजपे अँड असोशिएटस चे श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट यांची सन २०१९/२० वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळाचे लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करावी आणि त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार कार्यकारी समितीस द्यावेत असा ठराव सर्वानुमते मंजूर केला.

वार्षिक सर्वसाधारण सभेने, मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल (काळे भागशाळेसह) तसेच कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन २०१८-१९ च्या कार्य अहवालास सर्वानुमते मंजुरी दिली.

कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे यांनी सादर केलेल्या मंडळाच्या सन २०१९- २० च्या अंदाजपत्रकास सभेने मान्यता दिली.

उपाध्यक्ष श्री धनंजय परांजपे यांच्यासह अनेक सभासदांनी डॉ.श्री.र.लेले हायस्कूल इमारतीची दुरुस्ती आणि नुतनीकरण करावे या मुद्यावर भर दिला. इमारत दुरुस्तीसह मंडळाच्या इतर उद्दिष्टांच्या कार्यवाहीसाठी कायमस्वरुपी निधी असण्यावर वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमत झाले. उपस्थित सभासदांच्या भावना लक्षात घेऊन अध्यक्षांनी सुचविले की तारीख २९ मे २०२२ ला मंडळ आणि डॉ.श्री.र.लेले हायस्कूलच्या स्थापनेस साठ वर्षे पूर्ण होत आहेत. या तारखेपूर्वी संकुलातील सर्व इमारतींचे आणि काळे भागशाळेच्या दुरुस्ती आणि सुशोभिकरणाचे काम पूर्ण व्हावे अशाप्रकारे कामाचे नियोजन करण्यात यावे. विनंती पत्रकाद्वारे आणि संपर्कातून निधी संकलन करण्याची बाब अध्यक्षांनी सभेच्या निर्णयास टाकली त्यास सर्व सभासदांनी एकमताने पाठिंबा दिला. कार्यकारी समितीने विचारविनिमय करुन प्रस्ताव तयार करावा आणि निधी संकलनास सुरुवात करावी असा सर्वमान्य निर्णय घेण्यात आला.

मंडळाची सर्व शैक्षणिक आस्थापने ज्या भूखंडावर आहेत त्या भूखंडांचा बिगरशेती महसूल माफ व्हावा यासाठी संबंधीत सरकारी कार्यालयांकडे अर्जविनंती/ पत्रव्यवहार करावा असा प्रस्ताव श्री बाळकृष्ण पाळेकर यांनी मांडला तो सर्वमान्य झाला. वार्षिक सर्वसाधारण सभेने कार्यवाहीचे अधिकार कार्यवाह, उपाध्यक्ष, सहकार्यवाह व सहकोषाध्यक्ष यांना देण्याचा ठराव मंजूर केला.

वार्षिक सर्वसाधारण सभेचे निमित्त साधून सर्वसहभागाने पर्ण फुले, रांगोळी प्रदर्शनाचे सुंदर आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष श्री विश्वासराव पाळेकर यांचे हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

**कृतज्ञता स्मरण:**

सभासदांचे हार्दिक पाठबळ, कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम, चिकाटी, कार्यक्षमता आणि सन्माननीय देणगीदारांचे समर्थ आर्थिक पाठबळ यांचे जोरावर मंडळाची आगेकूच दमदारपणे सुरु असल्याने कार्यकारी समिती अहवालात संकल्प, ध्येय आणि उद्दिष्टांच्या सिध्दीसाठी झटणारे सभासद, हितचिंतक, सन्माननीय देणगीदार, ग्रामस्थ आणि आजीमाजी विध्यार्थी यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण

करीत आहे.

**आभार प्रदर्शन:**

अहवालाचे अखेरीस मंडळाचे सर्व सभासद, हितचिंतक, आजी-माजी विध्यार्थी, मुटाट, मणचे, पाळेकरवाडी, वाघोटण, सडेवाघोटण या पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालकवर्ग, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट, कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय मुटाट, डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे या शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

मंडळाचे लेखापरीक्षक मे.परांजपे अँड असोशिएटस चे श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाउटंट, विश्वस्त सर्वश्री विष्णु सखाराम मराठे, डॉ. दिलीप केशव राणे, अनंत श्रीधर लेले यांचेही नम्रतापूर्वक आभार.

डॉ. श्री.र.लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय परिसर तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा येथिल अनेक विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणाऱ्या सर्व ट्रस्टचे, सन्माननीय देणगीदारांचे आणि माजी विध्यार्थ्यांचे नम्रतापूर्वक आभार.

आर्किटेक्ट आणि इंजिनिअर श्री जनार्दन.एस.संख्ये यांनी मंडळाच्या विनंतीनुसार मुटाटला भेट देवून स्थापत्य शास्त्रीय निकषांनुसार सर्व इमारतींची प्रत्यक्ष विनामुल्य तपासनी करुन, डागडुजी आणि दुरुस्तीसंबंधीचा तपशीलवार रिपोर्ट सादर केला आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

डॉ. श्री.र.लेले हायस्कूलच्या शालांत परीक्षेच्या विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करणाऱ्या फुले, आंबेडकर, शाहू शालांत परीक्षा मार्गदर्शन मंचचे श्री विलास साळुंके, श्री रविंद्र साळुंके, डॉ. किशोरजी क्षीरसागर आणि सर्व सहकारी शिक्षक आणि मित्रमंडळींचे मन:पूर्वक आभार. त्याचबरोबर इयत्ता बारावीच्या विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे श्री अरुणजी राणे यांचेही खास आभार.

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे विशेषाधिकार समिती सदस्य, मुटाट व मणचे स्थानिक समिती सदस्य, शाळा समिती सदस्य आणि शिक्षक पालक संघ सदस्यांचेही आभार.

मंडळाच्या कार्यास प्रोत्साहन देत वेळोवेळी मार्गदर्शन करणारे मा.खासदार श्री विनायकजी राऊत, मा.आमदार श्री नितेशजी राणे, पंचायत समिती सदस्य श्री रवी पाळेकर आणि पंचक्रोशीतील सर्वपक्षीय नेत्यांचे मन:पूर्वक आभार.

कार्यकारी समितीच्या औपचारिक आणि अनौपचारिक सभांना जागा उपलब्ध करुन उपस्थितांचे आपुलकीने स्वागत आणि आदरातिथ्य करणाऱ्या सौ.मृदुलाताई लेले यांचे खास आभार.

मणचे येथिल जेष्ठ कार्यकर्ते मा. बापूसाहेब गोखले आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मणचे भागशाळा संचालनाबद्दल आभार.

शेवटी मंडळाच्या संचालन कार्यात महत्वाचा वाटा उचलणारे आमचे मुटाट आणि मणचे येथिल पदाधिकारी आणि सदस्य तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्व आदरणीय व्यक्तींचे आणि संस्थांचे नम्रतापूर्वक आभार मानून येणाऱ्या काळात विध्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम, व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्य विकासास पूरक सुविधा निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न राहील याची सर्व सभासदांना ग्वाही देऊन अहवालाची समाप्ती करतो.

**आपले कृपाभिलाषी**

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

| | | |
|---|---|---|
| **श्री विश्वासराव रामचंद्र पाळेकर**<br>**अध्यक्ष** | **श्री विनायक कृष्णाजी लेले**<br>**कार्याध्यक्ष** | **श्री सुभाषचंद्र गणेश परांजपे**<br>**कार्यवाह** |

**<u>सुधारीत घटना आणि नियमांनुसार २२ डिसेंबर २०१७ पासून प्रस्तावित बदल</u>**

**<u>मंडळाचे उद्देश:</u>**

१. सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्याच्या मुटाट व आसपासच्या भागांतील मुलामुलींच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी पुरविणे.
२. त्याच भागांतील मुलामुलींसाठी कला, शास्त्र, वाणिज्य,अभियांत्रिकी, कृषिविषयक आणि महाविध्यालयीन शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे.
३. विविध अभ्यासक्रमातील पदविका सुरु करुन व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी पदविका वर्ग सुरु करणे.
४. शाळा आणि महाविद्यालयातील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि व्यावसायिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविणे आणि उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन करणे.
५. ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारे उपक्रम सुरु करुन विद्यार्थ्यांना मोबदला देणारे व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

**<u>सभासद वर्गणी:</u>**

- आधारस्तंभ: रु. २५०००/-
- आश्रयदाते: रु. १००००/-
- हितचिंतक: रु. ५०००/-
- आजीव सभासद: रु. ५००/-

सन्मान्य सभासद: मंडळाच्या कार्याला चालना देणाऱ्या व विशेष कार्यामुळे मंडळाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या व्यक्तींना सन्मान्य सभासदत्व देण्याचा अधिकार कार्यकारी समितीला आहे.

- **बँकर्स**
- बँक ऑफ महाराष्ट्र – गिरगांव आयडीबीआय बँक – दादर
- स्टेट बँक ऑफ इंडिया – देवगड बँक ऑफ महाराष्ट्र- जामसंडे
- विदर्भ कोकण ग्रामीण बँक – मुटाट सिंधुदुर्ग जिल्हा म.सह.बँक- मणचे

## मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट,

## कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे व कै.सौ.जानकी शिवराम राणे

## कला व वाणिज्य संयुक्त कनिष्ठ महाविद्यालय मुटाट,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग.

### वार्षिक अहवाल २०१९-२०

शैक्षणिक वर्ष सन-२०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा अहवाल लिहिताना विशेष आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच सर्व शालेय समित्या,कर्मचारी व ग्रामस्थ या सर्वांनी चांगले सहकार्य केल्यामुळे शाळेच्या सर्वांगीण विकासात भर घालता आली. सुरुवातीलाच या सर्वांना धन्यवाद.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट मध्ये एकूण २९९ विद्यार्थी, व कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मध्ये एकूण ११० विद्यार्थी तसेच कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य संयुक्त कनिष्ठ महाविद्यालय मुटाट मध्ये इ. ११ वी व १२ वी एकूण १३० विद्यार्थी अशी सर्व मिळून ५३९ मुले शिक्षण घेत आहेत.

१. एस.एस.सी मार्च २०२० परीक्षा निकाल- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० परीक्षेसाठी मुटाट मधून ७० विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होवून १०० टक्के इतका निकाल लागला. तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मधून २७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले त्यापैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण होवून ९६.३० टक्के इतका निकाल लागला. तसेच एस.एस.सी.मार्च २०२० परीक्षेला यशवंतराव राणे माध्यमिक विद्यालय बापर्डे या प्रशालेची २९ मुले आमच्या हायस्कूल मधून परीक्षेला प्रविष्ठ झाली पैकी २८ मुले उत्तीर्ण होवून निकाल ९६.५५ टक्के लागला.

वरील प्रमाणे एकूण १२६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले त्यापैकी १२४ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा एस.एस.सी.परीक्षेचा निकाल ९८.४१ टक्के लागला.

शाळेचे गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत. (एकत्रित)

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्के |
|---|---|---|
| १ | कु.साक्षी सचिन राणे | ९४.६० |
| २ | कु.तन्वी संजय वारीक | ९२.४० |
| ३ | कु.चैत्राली अजय मराठे | ९०.८० |

मुटाट व मणचे गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्के |
|---|---|---|
| १ | कु.तन्वी संजय वारीक | ९२.४० |
| २ | कु.चैत्राली अजय मराठे | ९०.८० |
| ३ | अझमत समीर सोलकर | ८९.२० |

२. एच.एस.सी.मार्च २०२० परीक्षा निकाल- फेब्रुवारी/मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी कै.जानकी शिवराम राणे कनिष्ठ महाविद्यालयातून एकूण ७३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी ७१ विद्यार्थी उत्तीर्ण होवून निकाल ९७.२६ टक्के इतका लागला.
कला शाखा- ४२ विद्यार्थी पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण होवून ९७.६१ टक्के निकाल लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणें-

| | अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | मिळालेले गुण | टक्के | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| कला शाखा | १ | कु.प्रियांका रविंद्र परब | ४३७/६५० | ६७.२३ | पाळेकरवाडी |
| | २ | कु.श्रुतिका नितीन पाळेकर | ४३३/६५० | ६६.६१ | पाळेकरवाडी |
| | ३ | कु.देवयानी राजेंद्र परब | ४३१/६५० | ६६.३० | क.वाघोटण |

वाणिज्य शाखा- ३१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण होवून वाणिज्य शाखेचा निकाल ९६.७७ टक्के लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणें-

| | अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | मिळालेले गुण | टक्के | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| वाणिज्य शाखा | १ | कु.कोमल प्रकाश परब | ५२२/६५० | ८०.३१ | मुटाट |
| | २ | रोशन विश्वास राणे | ५१४/६५० | ७९.०८ | मुटाट |
| | ३ | कु.पूनम अनाजी पभू | ४९७/६५० | ७६.४६ | मुटाट |

३. गणित संबोध परीक्षा-

सिंधुदुर्ग जिल्हा गणित अध्यापक मंडळामार्फत दि. १८/०८/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेस इ.५ वी मधून १४ व इ.८ वी तून ५२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. पैकी अनुक्रमे १४ पैकी १०विद्यार्थी प्रथम श्रेणी व ४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. ५२ पैकी ४७ विद्यार्थी प्रथम श्रेणी व ५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. ९० पेक्षा जास्त गुण मिळविणारे एकूण १२ विद्यार्थी आहेत.

४. गणित प्राविण्य परीक्षा-

महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेला इयत्ता ८ वी तून ०८ विद्यार्थी प्रविष्ठ झाले.

५. चित्रकला परीक्षा-

शासकिय चित्रकला एलिमेंटरी परीक्षेसाठी एकूण ३१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी २८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल ९०.३२ टक्के लागला. तसेच इंटरमिजिएट परीक्षेसाठी एकूण ४६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी १८ उत्तीर्ण होवून निकाल ३९.१३ इतका लागला. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना या परीक्षेचा फायदा झाला.

६. राष्ट्रभाषा सभा पुणे मार्फत बालबोधिनी परीक्षा-

राष्ट्रभाषा सभा पुणे मार्फत सप्टेंबर २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी शाळेतील इ.५ वी व ६ वी मधून ३१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी ०३ विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणी, २३ प्रथमश्रेणी ०३ द्वितीय श्रेणी व ०१ तृतीय श्रेणी उत्तीर्ण झाले.

७. शिष्यवृत्ती परीक्षा-

इ.५वी तून ०६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. इ.८वी तून १९ विद्याार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी ०१ विद्यार्थी पात्र ठरला.

८. नवोदय विद्यालय निवड चाचणी - इ.५ वी साठी

इयत्ता ५ वीच्या वर्गातून या परीक्षेसाठी एकूण ०७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले. इयत्ता ८ वीच्या वर्गातून या परीक्षेसाठी एकूण ०४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले.

९. एनएमएमएस परीक्षा

आर्थिक दुर्बल घटकांतील मुलांसाठी असणा-या परीक्षेस इयत्ता ८ वी तून एकूण ०८ विद्यार्थी परीक्षेला बसले. पैकी ०१ पात्र झाला. परंतु मेरीट स्कॉलरशिपसाठी निवड नाही.

१०. युवा संसद वक्तृत्व स्पर्धा-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाराष्ट्र शासनामार्फत युवा संसद वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धा फक्त कनिष्ठ महाविद्यालयीन गटात होती. स्पर्धेचे नियोजन चार स्तरावर केले होते.

अ) शाळा स्तर- २० विद्यार्थी सहभाग पैकी प्रथम तीन विद्यार्थ्यांची विभाग स्तरावर निवड झाली.

ब) विभाग स्तर-

विभाग स्तरामध्ये देवगड व मालवण तालुक्यातील कॉलेजीस सहभागी होती. एकूण २० कनिष्ठ महाविद्यालयांच्या स्तरावरील या स्पर्धेत आमच्या क.महाविद्यालयाची कु.भारती अजय पाळेकर हिने द्वितीय क्रमांक मिळवून विभाग स्तरावरील रूपये- २०००/- चे पारितोषिक मिळविले व तिची जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

क) जिल्हास्तर-

जिल्हास्तरावर एकूण २४ स्पर्धक होते. या स्तरावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.शिक्षणाधिकारी जि.प.सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली वरील २४ मुलांची युवा संसद भरविली गेली व त्यामध्ये आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या कु.भारती अजय पाळेकर हिला विरोध पक्ष नेता म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

११. क्रिडास्पर्धा-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीच्या शासकिय क्रिडास्पर्धा माहे ऑगस्ट २०१९ पासून सुरू झाल्या. विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेवून घवघवीत यश संपादन केले.

अ.द्ध मैदानी स्पर्धा-

दिनांक- २१/०९/२०१९ ते दिनांक- २३/०९/२०१९ या कालावधीत झालेल्या विविध तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत ३५ मुलांनी सहभाग घेतला त्यातील अनेक मुलांची जिल्हास्तरावर निवड झाली.

१द्ध १०० मीटर धावणे-

कु.तन्वी लक्ष्मण पाळेकर इ. १० वी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला.

२द्ध २०० मीटर धावणे- सुजल मंगेश पाळेकर इ. १० वी तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक व जिल्हास्तरावर सहभाग नोंदवला.

३द्ध ८०० मीटर धावणे- अनेक मुलांनी तालुकास्तरावर सहभाग नोंदवला.

४) गोळाफेक- कु.हर्षाली अनिल परब इ.८ वी तालुकास्तर प्रथम क्रमांक व जिल्हास्तर सहभाग.

५) थाळीफेक -

१ कु.हर्षाली अनिल परब इ.८ वी तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक व जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळविला.

२ अनुज संजय घाडी इ.९ वी तालुकास्तर द्वितीय क्रमांक व जिल्हास्तर सहभाग नोंदविला.

६) लांब उडी - सागर संतोष येरम इ. १० वी तालुकास्तर तृतीय क्रमांक मिळविला.

७) उंच उडी - राज प्रकाश कोळसुमकर इ. १० वी तालुकास्तर तृतीय क्रमांक मिळविला.

८) रिले ४ ग १०० - या स्पर्धेसाठी शाळेचे ३ संघ सहभागी.

ब.द्ध सांघिक स्पर्धा -

अ) कबड्डी - १४,१७ व १९ वर्षाखालील मुलींचे तीन संघ सहभागी व १७ वर्षाखालील मुलींचा एक संघ सहभागी.

ब) खो-खो तालुकास्तर स्पर्धा -१४ व १७ वर्षाखालील मुलांचे दोन संघ सहभागी. १४,१७ व १९ वर्षाखालील मुलींचे तीन संघ सहभागी.

१) १४ वर्षाखालील मुलगे- तालुकास्तर प्रथम व जिल्हास्तर सहभाग.

२) १७ वर्षाखालील मुलगे- तालुकास्तर द्वितीय क्रमांक.

३) १४ वर्षाखालील मुली- तालुकास्तर द्वितीय क्रमांक.

४) १७ वर्षाखालील मुली- तालुकास्तर प्रथम क्रमांक,जिल्हास्तर प्रथम क्रमांक.
विभागस्तर सहभागी-सांगली विरुध्द पराजय.

५) १९ वर्षाखालील मुली- तालुकास्तर प्रथम क्रमांक,जिल्हास्तर द्वितीय क्रमांक.

१२. विज्ञान प्रदर्शन-

सन-२०१९-२० मधील ४५ व्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्याचा बहुमान शाळेला मिळाला. दि. ०३ डिसेंबर ते दिनांक-०५ डिसेंबर २०१९ रोजी हे तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शन आमच्या प्रशालेच्या प्रांगणात घेण्यात आले. या प्रदर्शनाचे नियोजन उत्कृष्ट प्रकारे करून भव्य-दिव्य असे करण्यात आले. तालुक्यातील अनेक शाळांनी फोनद्वारे उत्कृष्ट आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक मिळून १२८ शाळांचा सहभाग नोंदला गेला. प्राथमिक व माध्यमिक शाळांनी उत्कृष्ट उपकरणे, प्रयोग सादर केले. एक आदर्शवत असे आयोजन करण्यात आले.

१) विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभाग घेतलेल्या शाळांचे शिक्षक प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी अशा सर्वांची चहापानाची व भोजनाची व्यवस्था उत्कृष्ट करण्यात आली.

२) प्रदर्शनाची मांडणी आकर्षक पध्दतीने करण्यात आली.

३) प्रदर्शनातील प्रश्नमंजूषा स्पर्धा पी.पी.टी च्या सहाय्याने मोठया पडदयावर घेण्यात आली. संपूर्ण रंगमंच्याचा वापर करण्यात आला.

४) प्रदर्शनातील परिक्षणासाठी तालुक्याबाहेरील तसेच जिल्हयाबाहेरील परिक्षकांची व्यवस्था करण्यात आली.

५) तालुक्यातील अनेक शाळांनी मोठया संख्येने विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन आनंद घेतला.

६) विज्ञान प्रदर्शनाच्या समारोपाच्या कार्यक्रमासाठी सन्मा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती देवगड हे उपस्थित होते. तसेच तीनही दिवस सन्मा.गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती देवगड (शिक्षण विभाग) हे उपस्थित होते.

७) विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने बाहेरून आलेल्या शिक्षकांनी तसेच मान्यवरांनी शाळेची व या परिसराची तुलना रविंद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतनशी केली.

८) विज्ञान प्रदर्शनाच्या वक्तृत्व स्पर्धेत शाळेतील कु.दिप्ती रघुनाथ वारीक हिने प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरासाठी पात्र ठरली.

१३) शनिवार दि.२१/१२/२०१९ रोजी स.ह.केळकर महाविद्यालय देवगड येथे समूह नृत्य स्पर्धा भरविल्या गेल्या त्यामध्ये आमच्या प्रशालेच्या आदिवासी नृत्त्याला प्रथम क्रमांक मिळाला. रूपये-५०००/- रोख बक्षिस देवून सन्मान केला.

१४) देवगड बीच फेस्टीव्हल- ३१ डिसेंबर २०१९ रोजीच्या देवगड बीच फेस्टीव्हलमध्ये शाळेचे आदिवासी नृत्य सादर करणेसाठी निमंत्रण मिळाले व त्यामध्ये रूपये-२०००/- रोख बक्षिस देवून सन्मान केला.

१५) योगदिन-

२१ जून हा दिवस संपूर्ण जगभर योग दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या प्रशालेतही योगाचे महत्व सांगून प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. आपल्याच परिसरातील श्री.कृष्णा विष्णू पाळेकर,श्री.नारायण आत्माराम पाळेकर ;पाळेकरवाडीद्ध श्री.बन्सी तारी यांनी प्रात्यक्षिके करून मुलांकडून करवून घेतली.

१६) रक्षाबंधन-

संपूर्ण शाळेमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला व त्या अनुषंगाने बंधु-भाव जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला.

१७) अकरावी स्वागत समारंभ सोहळा-

दरवर्षी प्रमाणे इयत्ता ११ वीत प्रवेश घेणा-या मुला-मुलींचा स्वागताचा समारंभ घेण्यात आला. इयत्ता

१२ वीच्या विद्यार्थ्यांनी पुष्प देवून स्वागत केले. इयत्ता १२ वीच्या मुलांकडून खाऊचेही वाटप करण्यात आले. या सोहळयाला पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

१८) सरस्वती पूजन -

अगदी उत्साही वातावरणात सरस्वती पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. सर्व पालकांना,महिलांना या समारंभाचे निमंत्रण दिले गेले. या निमित्ताने सर्वच मुला मुलींनी गरबा नृत्याचा आनंद घेतला.

१९) जयंती कार्यक्रम व पुण्यतिथी कार्यक्रम-

वर्षभरात अनेक थोर पुरूषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ०१ मार्च हा आपल्या शाळेचे संस्थापक डॉ.श्रीधर रघुनाथ लेले यांचा जन्मदिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

२०) इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मार्गदर्शन वर्ग-

दरवर्षी प्रमाणे इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या मुलांसाठी मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक वर्गांचा मुलांना चांगल्या प्रकारे उपयोग झाला.

२१ स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे स्नेहसंमेलन शुक्रवार दिनांक-२७ डिसेंबर व शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०१९ रोजी संपन्न झाले. दिनांक-२७ डिसेंबर २०१९ रोजी पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या समारंभाचे प्रमूख पाहूणे म्हणून मा.श्री.सदानंद वामन पवार (उपाध्यक्ष, देवगड एज्यूकेशन बोर्ड मुंबई) व मा.श्री.अशोक मनोहर देसाई ,सौ.आकांक्षा अशोक देसाई आणि श्री रमेश रामचंद्र भिडे (निमंत्रित सन्मा.पाहूणे) यांची उपस्थिती होती. तसेच या सोहळयास मंडळाचे सन्मा. अध्यक्ष श्री.विश्वासराव रामचंद्र पाळेकर व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. तसेच शनिवार दिनांक- २८ डिसेंबर २०१९ रोजी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे करण्यात आले. या कार्यक्रमाला संपूर्ण पंचक्रोशीतून पालक व इतर सर्व उपस्थित होते.

२२) आभार प्रदर्शन-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, ग्रामस्थ व इतर मान्यवर यांनी डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या (कै.भाऊसाहेब काळे भागशाळेसह) आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाच्या विकासासाठी मोलाचा हातभार लावला त्या सर्वांचे खूप खूप ऋण व्यक्त करतो. माझे सर्व सहकारी शिक्षक, कर्मचारी वर्ग, पालक आणि विद्यार्थी यांचे उत्तम सहकार्याबद्दल आभार. मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.विश्वासराव पाळेकर, कार्याध्यक्ष श्री विनायक लेले, उपाध्यक्ष सर्वश्री शिवाजी राणे आणि धनंजय परांजपे कार्यवाह श्री.सुभाषचंद्र परांजपे, कोषाध्यक्ष श्री संजय टाकळे यांच्यासह मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले त्याबद्दल मन:पूर्वक आभार. शेवटी वर्षभर मोलाची मदत आणि मार्गदर्शन करणाऱ्या सर्व ज्ञात व अज्ञात व्यक्तिंना धन्यवाद देतो आणि आभार मानून सर्वांचा यापुढेही असाच लोभ राहो अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद !

श्री.दिलीप तुकाराम घरपणकर
मुख्याध्यापक/प्राचार्य
डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे
कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय मुटाट.

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## 31 मार्च 2020 रोजीचे ताळेबंद पत्रक

| **निधी व देणी** | **2019-20**<br>**रु. पै.** | **मालमत्ता व येणी** | **2019-20**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **स्मारक निधी सामान्य निधी** | | **स्थावर मालमत्ता जमीन,इमारत वगैरे** | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | **5368247.66** | मागील ताळेबंदाप्रमाणे | **7162339.85** |
| उत्पन्न खर्च खात्यातून वर्ग | | वर्षभरातील वाढ/भर | |
| | | वजा: विक्री | |
| **अन्य वर्गीकृत निधी** | **2468749.76** | घसारा: इमारत घसारा निधीत वर्ग | |
| घसारा निधी | | | |
| इमारत निधी | | **गुंतवणुका** | |
| राखीव निधी | | बँका व एच.डी.एफ.सी.कडील मुदत ठेवी | **1999652.90** |
| इतर निधी | **10955190.99** | ८ % भारत सरकारचे रोखे | |
| | **Nil** | | |
| **कर्ज उचल** | | **फर्निचर, साहित्य व उपकरणे** | |
| विश्वस्त/संचालकांकडून | | मागील ताळेबंदाप्रमाणे | |
| इतरांकडून | **0.0** | वर्षभरातील वाढ | **0** |
| | | विक्री | |
| **देणी** | | घसारा : घसारा निधीत वर्ग | |
| सामान्य खर्च | **35410.00** | | |
| उचल परतफेड | | **कर्जाऊ शिष्यवृत्त्या येणी** | |
| भाडे आणि अन्य देणी | | | **0** |
| संकिर्ण खर्च | | **येणी** | |
| | | अनामत व येणी | **238972.00** |
| **उत्पन्न- खर्च खात्याचा निष्कर्ष** | **139766.00** | आयकर येणे | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | भाडे,व्याज अन्य | |
| वजा उत्पन्न-खर्च खात्यातील चालू वर्षाची तूट | | | |
| | | **उचल** | |
| | | विश्वस्त/संचालक | **0** |
| | | कर्मचारी | |
| | | कंत्राटदार | |
| | | अन्य | |
| | | **रोख व बँक – शिल्लक** | |
| | | मुंबई/मुटाट कार्यालय रोख | **9566399.66** |
| | | मुख्याध्यापकांकडे रोख | |
| | | बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगाव | |
| | | आयडीबीआय बँक लि. दादर | |
| | | स्टेट बँक ऑफ इंडिया ,देवगड | |
| | | विदर्भ कोकण ग्रामीण बँक - मुटाट | |
| | | बँक ऑफ महाराष्ट्र, जामसंडे | |
| | | रुपी बँक/कॉसमॉस बँक/सीकेपी बँक/मुंबै बँक | |
| | | शाळेच्या बचत खाती | |
| **एकूण** | **18967364.41** | **एकूण** | **18967364.41** |

मुंबई- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

सही/- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊंटंट

सही/- सं,द,टाकळे, कोषाध्यक्ष

सही/- वि.रा.पाळेकर, अध्यक्ष

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## 31 मार्च 2020 रोजी संपलेल्या वर्षांचा उत्पन्न व खर्च खात्याचा सारांश

| खर्च | 2019-20<br>रु. पै. | उत्पन्न | 2019-20<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **मालमत्तेविषयी खर्च** | **221936.00** | **इमारत भाडे** | **24588.00** |
| सारा मालमत्ता कर | | | |
| दुरुस्ती देखभाल | | **व्याज** | **560152.16** |
| वेतन | | बचत खात्यावरील | |
| विमा | | बॅंकेतील मुदत ठेवीवर | |
| घसारा तरतूद | | एच.डी.एफ.सी.मुदत ठेवीवर | |
| अन्य खर्च | **6777.35** | सरकारी रोख्यांवरील | |
| | | | **Nil** |
| **आस्थापन खर्च** | | **लाभांश** | |
| टपाल दूरध्वनी छपाई लेखन साहित्य प्रवास | | | |
| खर्च इ. | **Nil** | **देणग्या** | **972400.00** |
| | | पुस्तक संग्रह निधी | |
| **विश्वस्थ/संचालक मानधन** | **Nil** | सामान्य निधी | |
| | | पारितोषिक व शिष्यावृत्ती निधी | |
| **विधी न्यायिक खर्च** | | इमारत निधी (मुटाट) | |
| **आयव्यय निरीक्षकांची बिदागी** | **10000.00** | **सरकारी अनुदाने** | **13563179.00** |
| **अंशदान आणि फी** | | **वेतन व वेतनेतर** | |
| निष्काषित रक्कम थकीत कर्जे | | | |
| शिष्यवृत्ती आणि पारितोषिके | | **अन्य मार्गाने जमा** | **50730.65** |
| थकीत भाडे अन्य | **0** | वर्गणी | |
| | | आंबा विक्री | |
| **संकीर्ण खर्च** | | फी,टर्म फी व अन्य फी | **45766.00** |
| बॅंक चार्जेस व्यावसाईक बिदागी | | | |
| किरकोळ | **0** | संकीर्ण | |
| **घसारा** | **0** | **राखीव निधीतून वर्ग** | |
| **राखीव अन्य निधींकडे वर्ग केलेल्या** | | **तूट ताळेबंदाकडे वर्ग** | |
| **रकमा** | **160991.75** | | |
| पारितोषिके व शिष्यवृत्त्या निधी सामान्य | | | |
| निधी इ. | **492794.16** | | |
| **उद्देश्यांप्रित्यर्थ खर्च (शैक्षणिक)** | | | |
| मंडळाने केलेला | **14212289.60** | | |
| शाळेने केलेला | | | |
| | **32026.95** | | |
| **शिल्लक ताळेबंदाकडे वर्ग** | | | |
| **एकूण** | **15216815.81** | **एकूण** | **15216815.81** |

मुंबई- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस
सही/- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट
सही/-

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता
सही/- सं,द,टाकळे वि.रा.पाळेकर
कोषाध्यक्ष अध्यक्ष

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलचा 01.04.2019 ते 31.03.2020 या वर्षांचा जमाखर्चाचा सारांश

| **उत्पन्न** | **2019-20**<br>**रु. पै.** | **खर्च** | **2019-20**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | **22644.71** | **इमारत भाडे** | **24588.00** |
| अनुसुची A प्रमाणे | | | |
| | | **पगार** | **13426602.00** |
| **सरकारी अनुदाने** | **13467213.00** | शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी: लेखनिक | |
| वेतन अनुदान वेतनेतर अनुदान | | शिपाई | |
| प्रवेश फी,टर्म फी | | | |
| उपकरणे व शैक्षणिक साहित्य | | **कचेरीचा खर्च** | **90550.80** |
| शालेय पोषण आहार | | छपाई लेखनसाहित्य | |
| | | टपाल, टेलिफोन | |
| **प्रवेश फी, टर्म फी व अन्य फी** | **3000.00** | प्रवास खर्च | |
| **अन्य जमा** | **1598.00** | **फर्निचर व उपकरणे** | **42976.00** |
| बँक खत्यातील व्याज | | पुस्तके, शैक्षणिक साधने | |
| किरकोळ जमा | | | |
| पालक शिक्षक संघ वर्गणी | | **वीज खर्च** | |
| वस्तूरुपाने देणग्या | | | |
| | | **लेखापरीक्षक मानधन** | |
| **अनावर्ती जमा** | **5523177.00** | | |
| | | **संकीर्ण खर्च** | |
| **मंडळाकडून उसनवार** | **161996.00** | | |
| | | **अनावर्ती खर्च** | **5516680.00** |
| **अन्य जमा : फी वसूली** | **87208.00** | | |
| | | **अन्य खर्च** | **86639.00** |
| **वस्तुरुपाने देणग्या** | | | |
| संगणक | | **फी येणे** | |
| पुस्तके | **6173.00** | | |
| | | **वस्तुरुपाने देणग्या** | |
| | | **मंडळाच्या उसनवार रकमेचा परतावा** | **55281.00** |
| | | **वर्ष अखेरची शिल्लक** | **29692.91** |
| **एकूण** | **19273009.71** | **एकूण** | **19273009.71** |

मुटाट- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस
सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलकरिता
सही- दि.तु.घरपणकर
मुख्याध्यापक

## मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचा 01.04.2019 ते 31.03.2020 या वर्षाचा जमा-खर्चाचा सारांश

| उत्पन्न | 2019-20<br>रु. पै. | खर्च | 2019-20<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक**<br>अनुसुची A प्रमाणे | **29662.40** | **पगार**<br>शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी: लेखनिक शिपाई | **293500.00** |
| **सरकारी अनुदाने**<br>वेतन अनुदान वेतनेतर अनुदान<br>प्रवेश फी,टर्म फी<br>उपकरणे व शैक्षणिक साहित्य<br>शालेय पोषण आहार | .. | **कचेरीचा खर्च**<br>छपाई लेखनसाहित्य<br>टपाल, टेलिफोन<br>प्रवास खर्च | **20139.80** |
| **प्रवेश फी, टर्म फी व अन्य फी** | **42388.00** | **फर्निचर व उपकरणे**<br>पुस्तके, शैक्षणिक साधने | |
| **अन्य जमा**<br>बँक खत्यातील व्याज<br>किरकोळ जमा<br>पालक शिक्षक संघ वर्गणी<br>वस्तूरुपाने देणग्या | <br>**1839.00** | **वीज खर्च**<br><br>**लेखापरीक्षक मानधन** | |
| **अनावर्ती जमा** | | **संकीर्ण खर्च**<br><br>**अनावर्ती खर्च** | |
| **मंडळाकडून उसनवार** | **293500.00** | **अन्य खर्च** | **0.00** |
| **अन्य जमा : फी वसूली** | **32615.00** | **फी येणे** | **32615.00** |
| **वस्तुरुपाने देणग्या**<br>संगणक | | **वस्तुरुपाने देणग्या** | |
| | | **मंडळाच्या उसनवार रकमेचा परतावा** | |
| | | **वर्ष अखेरची शिल्लक** | **53749.60** |
| **एकूण** | **400004.40** | **एकूण** | **400004.40** |

मुटाट- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस ,तळेरे

सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊंटंट

कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाकरिता

सही- दि.तु.घरपणकर

प्राचार्य/मुख्याध्यापक

## डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे

### मुख्याध्यापक/प्राचार्य शिक्षक आणि कर्मचारी वर्ग : सन 2019-20

| नाव | हुद्दा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| श्री दिलीप तुकाराम घरपणकर | प्राचार्य-मुख्याध्यापक | बी.ए.बी.एड. |
| श्री दिलीप यशवंत लेले | सहाय्यक शिक्षक | बी. एस्सी. बी. एड. |
| सौ. श्रध्दा शंकर पराडकर | सहाय्यक शिक्षिका | एम.ए.बी.एड. |
| श्री अनिल देविदास घुगे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| सौ.मृणाल रामदास कोयंडे | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.एड. |
| श्री रमेश न्हानू कविटकर | सहाय्यक शिक्षक | बी.एस्सी..बी.एड. |
| श्री पुंडलिक अच्यूत गोसावी | सहाय्यक शिक्षक | बी.ए.डी.एड. |
| सौ.मृणाली मंगेश मळये | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.पी.एड. |
| श्री उदय गोपाळ कदम | सहाय्यक शिक्षक | एम.ए.डी.एड. |
| श्री निलेश गोविंद तांबे | सहाय्यक शिक्षक | एच.एस.सी.डी.एड. |
| श्री तन्मय सदानंद कोठावळे | सहाय्यक शिक्षक | बी. एस्सी. बी. एड. |
| श्री चेतन रघुनाथ पाळेकर | आय.सी.टी.निर्देशक | १२ वी |
| श्री किशोर यशवंत खरबे | वरीष्ठ लिपिक | बी.कॉम |
| श्री संजय नारायण धुपकर | कनिष्ठ लिपिक | बी.कॉम |
| श्री अरुण धोंडू साळुंके | नाईक | १० वी |
| श्री विजय विश्वनाथ ठाकूरदेसाई | शिपाई | ९ वी |
| श्री प्रविण जनार्दन झोरे | शिपाई | ९ वी |
| श्री लक्ष्मण बाळकृष्ण घाडी | शिपाई | १२ वी |

## कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट

### संस्था नियुक्त शिक्षक सन 2019-20

| | | |
|---|---|---|
| श्री शैलेश कृष्णा पाडावे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| श्री अजित न्हानु कविटकर | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| कु. निशा विजय पाळेकर | सहाय्यक शिक्षिका | एम.ए.बी.एड. |
| कु. प्रणाली सुरेश रायकर | सहाय्यक शिक्षिका | बी.कॉम.बी.एड. |

# पुस्त प्रेष्य

प्रति

श्री/श्रीमती --------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------

प्रेषक:
कार्यवाह : श्री सुभाषचंद्र गणेश परांजपे,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ
डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग:पिन 416803.

प्रेषक:
कार्याध्यक्ष: श्री विनायक कृष्णाजी लेले,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ
स्वाती, ब, अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई 400028.